सकाळ

# शाहू महाराजांचे कार्य अलौकिक

## कुलगुरू लुईस रिचर्डसन; मुंबईत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद



**कोल्हापूर : ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्डसन यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ भेट देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

**कोल्हापूर, ता. १२ :** महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करणाऱ्या कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य अलौकिक स्वरूपाचे आहे, असे मत ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्डसन यांनी मुंबई येथे व्यक्त केले. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या आठशे वर्षांच्या इतिहासात श्रीमती रिचर्डसन यांच्या रूपाने कुलगुरुपद भूषविण्याची संधी एका महिलेस प्रथमच मिळाली आहे. त्या नुकत्याच भारत दौऱ्यावर आल्या असता मुंबईतील ब्रिटिश कमिशनरेटमध्ये देशातील शिक्षण क्षेत्रातील निवडक मान्यवरांशी त्यांनी संवाद साधला. यांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. शिंदे यांनी श्रीमती रिचर्डसन यांना शाहू महाराजांचा चरित्रग्रंथ भेट दिला आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याविषयी त्यांना माहिती दिली. ती ऐकून त्या चकित झाल्या.

त्या म्हणाल्या, ''भारतातील एखाद्या महान समाजसुधारक राजाविषयी मला भेट मिळालेले हे पहिलेच पुस्तक आहे. शाहू महाराजांचे कार्य हे काळाच्या पुढचे आहे. सामाजिक विषमता दूर करून शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडविण्याचे त्यांचे कार्य तत्कालीन भारतामध्ये अत्यंत महत्त्वाचे ठरले. हा संपूर्ण ग्रंथ मुळापासून वाचण्याची आता ओढ लागली आहे.''

डॉ. शिंदे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मानद प्रोफेसर असून गतवर्षी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात तेथील शास्त्रज्ञांसमवेत सुमारे महिनाभर संशोधनकार्य केले. त्या वेळी त्यांनी कुलगुरू रिचर्डसन यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली होती.

Kolhapur, Kolhapur-Today
13/10/2018 Page No. 5

# राजर्षी शाहूंचे महिलांसाठीचे कार्य अलौकिक

## ऑक्सफर्डच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्डस्न यांचे मत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

ज्या काळात महिलांमध्ये नुकतीच सक्षमीकरणाची जाणीव मूळ धरण्यास सुरुवात झाली होती, त्या काळात महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करणारे कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अलौकिक स्वरूपाचे आहे, असे मत ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्डस्न यांनी नुकतेच मुंबई येथे व्यक्त केले.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या आठशे वर्षांच्या इतिहासात रिचर्डस्न यांच्या रूपाने कुलगुरूपद भूषविण्याची संधी एका महिलेस प्रथमच मिळाली आहे. त्या नुकत्याच भारत दौऱ्यावर आल्या असता मुंबईतील ब्रिटिश कमिशनरेटमध्ये भारतातील शिक्षण क्षेत्रातील निवडक मान्यवरांशी त्यांनी संवाद साधला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. शिंदे यांनी रिचर्डस्न यांना शाहू महाराजांचा चरित्रग्रंथ भेट दिला आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याविषयी त्यांना माहिती दिली.

त्या म्हणाल्या, भारतातील एखाद्या महान समाजसुधारक राजाविषयी मला भेट मिळालेले हे पहिलेच पुस्तक आहे. शाहू महाराजांचे कार्य हे काळाच्या पुढचे आहे. सामाजिक विषमता दूर करून शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडविण्याचे त्यांचे कार्य तत्कालीन भारतामध्ये अत्यंत महत्त्वाचे ठरले. हा संपूर्ण ग्रंथ मुळापासून वाचण्याची आता ओढ लागली आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे हे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मानद प्रोफेसर असून, गतवर्षी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात तेथील शास्त्रज्ञांसमवेत सुमारे महिनाभर संशोधनकार्य केले. त्यावेळी त्यांनी कुलगुरू रिचर्डस्न यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली होती. तेथील संशोधन कार्याविषयीही यावेळी उभयतांत चर्चा झाली.



**मुंबई : ऑक्सफर्डच्या कुलगुरू लुईस रिचर्डस्न यांना शाहू महाराज चरित्रग्रंथ भेट देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

सकाळ

# विवेकानंद महाविद्यालयात गणितावर राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात गणित विभागातर्फे ॲडव्हान्स इन डिफरन्शियल इक्वेशन्स् यावर राष्ट्रीय परिषद झाली. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील गणित विषयाच्या प्रा. वर्षा गेज्जी, प्रा. डॉ. सुभाष केंद्रे, गोवा येथील बिटस् कॅम्पस् येथील प्रा. डॉ. पी. धनुमंजया, प्रा. डॉ. ए. के. पुंदर उपस्थित होते. सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. बीजभाषक म्हणून शिवाजी विद्यापीठातील गणित विभागप्रमुख प्रा. सरिता ठक्कर, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या. संशोधनपर शोधनिबंध सादरीकरण करण्यात आले. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे सहकार्य लाभले. प्रा. एस. पी. पाटणकर, प्रा. एस. टी. सुतार यांनी काम पाहिले.

Kolhapur, Kolhapur-Today
13/10/2018 Page No. 5

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2018
Times of India

# Deadline for qawwali event regn extended

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has extended the deadline to register for the third All-India Inter-University National Qawwali Competition from earlier October 10 to October 15.

In a circular, dated October 11, the director of students' development at SUK said as per university's letter issued on August 28 the last date of registration was October 10 but the university has decided to give an extension for registration.

"I request you to participate in the competition by deputing a team of your university and extend your cooperation for making the competition a grand success," the circular read.

It should be noted that the competition will be held on varsity campus on October 22 and 23.

R V Gurav, director of students' welfare, told **TOI** that the varsity has received around 10 entries so far and they

**In a circular, dated October 11, the director of students' development at SUK said as per university's letter issued on August 28 the last date of registration was October 10**

want as much participation as they could for the said event and that is why the extension is granted.

He added, "The present entries that we have received are from Maharashtra, Punjab, and Madhya Pradesh. Since the event is still new, the participation remains low. It was introduced around three years ago. Last year as well when Mumbai University had hosted the event only 9 teams had participated."

According to Gurav, all necessary preparations for the event are going on in full swing and it is going to be a new experience for the participants as well as the hosts.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2018
तरुण भारत

# दूरशिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण केंद्रामार्फत पदवी व पदव्युतर विषयांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये बी. कॉम भाग १, एम कॉम भाग १, एम. ए, भाग १ (मराठी, हिंदी, राज्यषास्त्र, इतिहास, समाजशास्त्र) एम. बी.ए या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यातील ७७ अभ्यास केंद्रामध्ये सुरू आहे. तरी इच्छूक विद्यार्थ्यानी प्रवेश घ्यावे, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे

**नियमित शुल्कासह १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदत**

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्लीकडून शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या १३ अभ्यासक्रमांपैकी ९ अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे. उर्वरित चार अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. १५ ऑक्टोबरपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज जमा करावा. विलंब शुल्कासह १७ ऑक्टोबरपर्यंत तर अतीविलंब शुल्कासह २० ऑक्टोबरपर्यंत अर्ज जमा करावयाचा आहे. दूरशिक्षण केंद्रात या प्रवेश घेण्यासाठी गर्दी झाली आहे.

13 OCT 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात इन्क्युबेशन सेंटर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेल्या रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटरमुळे विद्यार्थ्यांचा आणि शेतकऱ्यांचाही ज्ञानार्जनातून अर्थार्जनाकडील प्रवास सुकर होणार आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरीकल्चर या केंद्राचे उद्घाटन सोमवारी (दि. ८) झाले. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

या उद्घाटनाच्या निमित्ताने उस्मानाबाद जिल्ह्यातील ५५ शेतकऱ्यांसाठी दिनांक ८ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत या इन्क्युबेशन केंद्राच्या अंतर्गतच 'एकात्मिक रेशीम शेती' या विषयावरील प्रशिक्षण शिबिरही आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटनही कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर.के. कामत, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.जी. खोत, समृद्धी उद्योग



इन्क्युबेशन सेंटरमधील सुविधांची कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह मान्यवरांना माहिती देताना डॉ. ए.डी. जाधव.

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

समुहाचे मनिष पाटील, उस्मानाबादचे प्रगतशील रेशीम शेती उत्पादक बालाजी पवार आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, लाइफ सायन्स या विषयामधील रेशीम शेतीशी निगडीत भारतातील हे पहिले इन्क्युबेशन सेंटर आहे. विद्यार्थी अगर नागरिकांना नोकरीऐवजी स्वतःचा रोजगार सुरू करता यावा आणि त्या माध्यमातून इतर गरजू लोकांनाही रोजगार देता यावा त्या दृष्टीने या रेशीम शेती इन्क्युबेशनमध्ये रोजगार निर्मितीची पुरेपूर क्षमता आहे.'

दरम्यान, या आठवड्याच्या निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात जमिनीची तयारी, निवड, खताचे, पाण्याचे महत्व, चॉकी व प्रौढ रेशीम कीटक संगोपन, निर्जंतुकीकरण, तुती व रेशीम कीटकांचे विविध रोग व किड कोषबांधणी, विक्री, रेशीमशेतीतील मूल्यवर्धित उत्पादने, धागानिर्मिती, शासकीय योजना अशा विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2018
Times of India

# SUK to soon decide on postponing exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The demand of Shivaji University Teachers' Association (SUTA) to postpone the winter semester exam by at least two weeks will be discussed in the Board of Examination meeting called on October 17 at the university.

According to varsity officials, the fate of the exam schedule will be formally announced after the meeting. "Important points such as whether to postpone the repeater exam as well, scheduled to commence from October 23, or to postpone only regular exam —to commence from November 2 — or to not postpone both the exams will be taken in the meeting," a SUK official said.

However, it has been learned that the varsity is inclined towards postponing the exam. Since the said decision is generally taken by the board of exam members, it will merely be a formality to announce regarding the same.

Subhash Jadhav, vice-president, Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations (MFUCTO), said they met with the SUK officials regarding the exam issues and a positive response has been sought from them.

RH Patil, president of SUTA, said postponing the exam will provide relief to the students as there will be time to complete the remaining syllabus.

It should be noted that teachers associated with SUTA were on strike from September 25 to October 9. The agitation was called off on October 10 in the executive body meeting of Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations (MFUCTO).

The teachers' body is now demanding to postpone the exam so that the remaining syllabus in many colleges could be completed.